MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

# वर्षाला ३ गॅस सिलिंडर फ्री



कुणाला मिळणार लाभ?

प्रत्येक पात्र कुटुंबाला मोफत तीन गॅस सिलिंडर देण्यात येणार असल्याची घोषणा महायुती सरकारने केली आहे. यामध्ये एलपीजी गॅस प्रत्येक घराला देण्यासाठी प्रत्येक पात्र कुटुंबाला तीन गॅस सिलिंडर मोफत देण्यात येणार आहे. या योजनेचे नाव मुख्यमंत्री अन्नपूर्ण योजना असे असून ५२ लाख १६ हजार ४०० कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळणार राज्याचा २०२४–२५ या आर्थिक वर्षाचा अंतरिम अर्थसंकल्प दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी सादर केला होता, आता सन २०२४–२५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करण्यात आला. प्रत्येक पात्र कुटुंबाला मोफत तीन गॅस सिलिंडर देण्यात येणार असल्याची घोषणा महायुती सरकारने केली आहे. यामध्ये एलपीजी गॅस प्रत्येक घराला देण्यासाठी प्रत्येक पात्र कुटुंबाला तीन गॅस सिलिंडर मोफत देण्यात येणार आहे. या योजनेचे नाव मुख्यमंत्री अन्नपूर्ण योजना असे असून ५२ लाख १६ हजार ४०० कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. तर या योजनेमुळे पर्यावरण संरक्षण केलं जाईल, अशी घोषणा अजित पवार यांनी केली आहे. तर महिला धोरण आपण जाहीर केले होते. त्यात वेळोवेळी बदल केले. नुकतेच अष्टसुत्री महिला धोरण जाहीर केलं आहे. महिलांना पोषण आहार, रोजगार आणि कौशल्यासाठीच्या योजना राबवणार, लेक लाडकी योजना, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृयोजना आपण आणल्या. घर खरेदी साठी मुद्रांक शुल्क योजना.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२७५ | शुक्रवार दि.२८ जुन २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -275 | FRIDAY DT. 28 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# पालकमंत्र्याची गाडी फोडण्याची मस्ती कुंडलिक खांडेत कुठून आली – बाबूराव पोटभरे




## पालकमंत्री सर्वांचाच असतो बीड जिल्ह्यात खांडे विरोधात संतापाची लाट– सचिन जाधव

## पालकमंत्र्यावर हल्ला करण्याची भाषा कुंडलिक खांडे कोणाचा ऐकून करत आहे याची सखोल चौकशी होणे गरजेचे.?

## शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खाडेचे ऑफिस फोडलं.

## कुंडलिक खांड्याचा राजकीय जन्म अनिल दादा जगताप यांच्यापासून पण अनिल दादांच्या पाठीत खंजी खुपसत गद्दारी करून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पद मिळवलं.?




## कुंडलिक खांडेला गुत्तेदारीचा पैसा जास्त झाला म्हणून अनेक जणांना हाणमारीच्या गुन्ह्यामध्ये कुंडलीक खाडेवर गुन्हे दाखल.?

## दोन नंबरच्या धंद्यामध्ये कुंडलिक खांडे या अगोदर अनेकदा नाव आले.समोर ?

## थेट मंत्र्याला मारण्याची धमकी देण्याची मस्ती कुंडलिक खांडेत कोठून येते ? गुन्हेगार, दहशतवादी प्रवृत्तीच्या शिवसेनेच्या जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडेला बेड्या ठोका– बाबूराव पोटभरे

कोट्यवधी रुपयाचा निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून आनंद पंकजाताई धनु भाऊंना गोड गोड बोलत कुंडलिक खात्याने स्वतःची राजकीय पोळी व आर्थिक गणित भाजून घेत स्वतःचा फायदा केला आणि ताई धनभावला कसा धोका दिला या व्हायरल क्लिप मुळ सर्वांना माहीत आहे. ताई भाऊ तुम्ही दोघांनी असल्या खाडे सारख्या नेत्यांना पोसल्याने मस्ती

माजलगाव प्रतिनिधी– या अगोदर सुद्धा अनेक प्रकरणांमध्ये वादग्रस्त ठरलेला व मस्ती चढलेल्या शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखाला तात्काळ बेड्या ठोका आणि गुंड प्रवृत्तीच्या जिल्हाध्यक्षाला फिट पालकमंत्री ची गाडी फोडण्याची मस्ती कुठून आली आहे याची सखोल चौकशी करा कारण मराठा ओबीसी वाद जिल्ह्यात अत्यंत संवेदनशील विषय झाला आहे. अशा स्थितीत कुंडलिक खांडे सारख्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीकडून पालकमंत्री धनंजय मुंडे यांना मारण्याची धमकी देण्याची ऑडिओ क्लिप वायरल

### कुंडलिक खांडेविरोधात पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

बीड : पालकमंत्री हा बीड जिल्ह्याचा सर्वांचा असतो पालकमंत्र्याच्या विरोधामध्ये गाडी फोडण्याची व पालकमंत्री हल्ला करण्याची एक वेगळ्या प्रकारची मस्ती ही कुंडलिक खांडे मध्ये कुठून आली याची सखोल चौकशी करणे गरज आहे पालकमंत्री धनंजय मुंडे यांची गाडी फोडण्याची भाषा करणाऱ्या कुंडलिक खांडेला कोणाची फूस आहे हे पाहणे गरजेचे आहे तर शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे

कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती, यानंतर काल सायंकाळी जालना रोड परिसरातील त्यांचे ऑफीसही फोडण्यात आले होते. आज राष्ट्रवादीच्या एका पदाधिकाऱ्याकडून पेठबीड पोलीसात खांडेविरुद्ध फिर्याद देण्यात आली आहे. या फिर्यादीमध्ये दोन समाजात तेढ निर्माण होत असं वक्तव्य तसेच राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर हल्ला करण्याचा कट रचत असल्याचे असे स्पष्ट मत होत आहे. या सर्व बाबींच्या अनुषंगाने राष्ट्रवादीच्या एका पदाधिकाऱ्याच्या फिर्यादीवरून पेठ बीड पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीमध्ये महायुतीमध्ये सहभागी असणारे कुंडलिक खांडे यांची काल एक कथित ऑडीओ क्लिप व्हायरल झाली, यामध्ये त्यांनी माझ्या आयुष्यात पहिल्यांदा + पंकजा मुंडेयांना धोका दिलं असल्याचं मत व्यक्त केलं. तसेच बीडमध्ये आल्यानंतर धनंजय मुंडे यांच्या गाडीवर दगड मारू यासह इतर चर्चा त्या ऑडीओ क्लिपमध्ये आहेत. या सर्व बाबींच्या अनुषंगाने राष्ट्रवादीचे अजित पवार गटाचे सचिन जाधव यांच्या तक्रारीवरून वरून पेठबीड पोलीसात कुंडलिक खांडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

झाली आहे. ही मस्ती खांडेत आली कुठून याचा शोध घेण्याची गरज आहे. जिल्ह्यात खांडेला दंगली घडवायच्या आहेत का? असा सवाल उपस्थित करत या व्यक्तीला

बेड्या ठोकून जेरबंद करावे अशी मागणी बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी केली आहे.जिल्ह्यात ज्याचे गुटख्याचे, वाळूचे, जुगाराचे बेकायदेशीर धंदे आहेत. अशी व्यक्ती पालक मंत्र्यासारख्या व्यक्तीला मारण्याची धमकी देतो. ही मुजोरी कुठून येते. पैसा आणि राजकीय वरदास्तामुळे मंत्र्याला जर हे धमक्या अशा देत असतील तर सामान्य लोकांवर हेकाय अत्याचार करत असतील? हा चिंतनाचा विषय आहे. ओबीसी मराठा समाजात सुरू असलेल्या संवेदनशील वातावरणात मंत्र्याला मारण्याचे हे जर षडयंत्र रचत असतील तर त्यांचा हेतू शुद्ध दिसत नाही.एक दहशतवादीच अशी भाषा करू शकतो. यातुन जिल्ह्यात दंगली घडवण्यात त्यांचा उद्देश असू शकतो. त्याचे पाठीराखे कोण आहेत? यापूर्वी असे कोणकोणते षड्यंत्र त्यांनी जिल्ह्यात रचले आहेत. त्याचे पाठीराखे कोण आहेत याचाही शोध घेण्याचा प्रयत्न या व्हायरल ऑडिओ क्लिपमुळे दिसत आहे.आणि तो पोलिसांनी घेतला पाहिजे. आणि अशा गुन्हेगार दहशतवादी, समाजा समाजात तेड वाढवणाऱ्या व्यक्तीच्या मुसक्या आवळल्या पाहिजेत. व त्याच्या पाठीराख्यांचा शोध घ्यावा असे आवाहन बाबुराव पोटभरे यांनी यादरम्यान केले आहे.

# पंढरीच्या वारीपासून शेतकऱ्यांच्या चारीपर्यंत सर्वांना दिलासा देणारा अर्थसंकल्प – धनंजय मुंडे

## २०२३–२४ मधील सोयाबीन–कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५ हजारांची मदत – अजितदादांची घोषणा

### मुख्यमंत्री कृषी वीज बिल सवलत योजनेसह शेतकऱ्यांना अर्थसंकल्पात मोठा दिलासा – कृषिमंत्री मुंडेंनी मानले दादांचे आभार

मुंबई (प्रतिनिधी)

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांनी आज महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर केला या अर्थसंकल्पात पंढरीच्या वारी पासून शेतकऱ्यांच्या चारीपर्यंत सर्व समाज घटकांना दिलासा देणारा व विकासाची दूरदृष्टी असलेल्या हा अर्थसंकल्प असल्याचे मत राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे.

महिला आर्थिक धोरण, महिलांचा विकास, गृहिणींवरील कौटुंबिक ताण तणाव कमी करणे आदी करण्यासह या अर्थसंकल्पात मध्यमवर्गीय, सर्वसामान्य, युवा वर्ग आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमतेवर भर देण्यात आला आहे.

आजच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून महायुतीच्या सरकारने सन २०२३ २४ सालच्या खरीप हंगामामध्ये सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अपेक्षित असलेला भाव मिळाला नाही त्यामुळे घोषणा केल्याप्रमाणे सन २०२३ २४ मधील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा आज करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री कृषी वीज बिल सवलत योजना, तसेच त्यातून मागेल त्याला सौर पंप देणे, त्याचबरोबर आणखी महत्त्वाचे म्हणजे साडेसात हॉर्स पावर पर्यंतच्या कृषी पंपांना आता पूर्णपणे मोफत वीज देणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी खास अनुदान, जलयुक्त शिवार टप्पा २ साठी ६५० कोटींचा निधी, शेती क्षेत्रात आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा वापर करण्यासाठी संशोधन करण्यास १०० कोटींचा विशेष निधी, नानांनी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजनेचा दुसरा टप्पा २१ जिल्ह्यात राबवण्यास मान्यता, शेत मालासाठी गाव तिथं गोदाम योजनेस ३४१ कोटी, एक रुपयात पीकविमा योजनेत ई–पंचनामा प्रणाली असे अनेक दिलासादायक निर्णय जाहीर करण्यात आले आहेत. त्यातून राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

स्व.गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ अंतर्गत धनंजय मुंडे यांनी सुरू केलेल्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेतील सर्व ८२ वसतिगृहे उभारण्यास देखील मान्यता देण्यात आलाय असून, याबद्दल धनंजय मुंडे यांनी सरकारचे आभार मानले आहेत.

दरम्यान शाश्वत शेती व शेतकऱ्यांना दिलासा आणि आर्थिक सक्षमतेवर भर देणाऱ्या, विकासाची दूरदृष्टी असलेल्या अर्थसंकल्प तरतुदींसाठी धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

# जिजामाता चौकात मध्यरात्री आगीचे तांडव ! कोट्यावधीचे साहित्य जळून खाक झाले !



- महसुल विभागाने केले पंचनामे !
- जळीत कांडाची झळ बसलेल्या दुकानाचे वेगळे पंचनामे !
- चार अग्निशमन दलाने आणली आग आटोक्यात !
- आ.सुरेश धस यांनी मध्यरात्री हलवली यंत्रणा व घटनास्थळाही दिली भेट !

### आ.धस घटनास्थळी दाखल !

शुक्रवारी सकाळीच आ.धस हे घटनास्थळी हजर झाले ,क्षतीग्रस्त व्यापा–यांना धीर देत नुकसान भरपाई बाबत प्रयत्न करू असे आश्वासन दिले.

### आगीच्या भक्षस्थानी विविध दुकान !

मध्यरात्री लागलेल्या आगीत संतोष धनराज गटागट यांचे वर्धमान किराणा दुकान अंदाजीत ( ६५ ते ७० लाख) ,सचिन चंद्रकांत जाधव याचे जाधव काम्पुटर व सि सी टी व्ही चे दुकान (३५ ते ४० लाखाचे ) ,कृष्णा चंद्रकांत जाधव यांचे कॉफी सेंटर ( साडे चार ते साडे पांच लाख ) ,अणिल बाबासाहेब सव्वासे यांचे गोरक्षनाथ किराणा स्टोअर (३२ लाख ) शेख जमीर बागवान यांचे ज्युसबार व फ्रुट स्टॉल ( साडे पांच ते सहा लाख ) नितीन भाऊसाहेब जाधव यांचे ईश्वरी कलेक्शन (साडे ४२लाख ) ,रामेश्वर महादेव घोडके यांचे शिवशंभो ॲग्रो एजन्सीचे ७५ लाखाचे ,शिवाजी पांडूरंग टाचतोडे यांचे कोमल फुटवेअर साडेचार ते पांच लाखाचे नुकसान , विशाल लक्ष्मण सव्वासे चहाकाफी सेंटर जवळपास पावनचार लाखाचे नुकसान याशिवाय दुकांनाचे सेडचीही मोठी हानी झाली आहे .

शिरूर कासार (प्रशांत बाफना): शहरातील बीड पाथर्डी रोडवरील जिजामाता चौकात गुरूवारी मध्यरात्री लागलेल्या आगीत दहा बारा दुकांनाचे मोठे नुकसान केले तर कोट्यावधी रक्कमेच्या साहित्याची राख रांगोळी केल्याची मोठी घटना घडली ,आगीची माहिती आ.सुरेश धस यांना मिळताच त्यांनी सर्व यंत्रणा कामाला लाऊन आष्टी ,पाटोदा ,पाथर्डी ,बीड येथून चार अग्निशमन दलासहित गाड्या हजर झाल्या त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले मात्र तोपर्यंत कोट्यावधीचे साहित्र जळुन खाक झाले होते .शुक्रवारी सकाळी महसुल विभागाने सविस्तर पंचनामे केले तर आ.धस यांनी घटनास्थळी भेट देऊन व्यापा–यांना नुकसान भरपाई बाबत प्रयत्न करू असे सांगितले.

गुरूवारी रात्री अचानक मध्यरात्री साडेबारा च्या दरम्यान एका दुकानाला आग लागुन धूर निघत असल्याचे दिसून आले यावेळी बंदोबस्तावर असलेल्या पोलीसांच्या ही बाब लक्षात आली त्याचबरोबर शहरातही ही वार्ता पसरली आणि मोठ्या संखेने चौकात जनसमुदाय जमा झाला ,भ्रमण ध्वनीवरून आ.धस यांना आगीची माहिती कळवताच त्यांनी तातडीने चारही ठिकाणाहून अग्निशमन दल व गाड्या रवाना केल्या तोपर्यंत आगिने दहाबारा दुकानाला कवेत घेऊन दुकानातील विक्रिचे साहित्र फर्निचर आदी साहित्याचा कोळसा केला होता ,आग नियंत्रणात आणन्यात दल यशस्वी झाले मात्र मोठी हानी झाली आहे ,प्रथम दर्शनी शाटसर्किटन ही आग लागल्याचे पंचनाम्यात नमुद केले आहे .

रस्ता तेलाने माखला !

किराणा दुकानात गोडतेलाचे डबे होते आगिमुळे हे डबे फुटले व त्यातील तेलाने चौक व रस्ता तेलाने माखला गेल्याचे दिसून येत होते .

आग आटोक्यात आणन्यासाठी शेकडो हात धावून आले !

आगीची वार्ता समजताच

नगरपंचायतची सर्व यंत्रणा नगरसेवक व शहरातील नागरीकांचे शेकडो हात मदतीला धावून आले होते .शहरात प्रथमच सामुहिक मोठी हानी या आग्नीकांडामुळे झाली असल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे .

# तलवाडा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या हेकेखोर धोरणामुळे शेतकरी व खातेदार त्रस्त!

**गेवराई ।प्रतिनिधी**

**ताक्यातील तलवाडा येथील महाराष्ट्र बँकेच्या मॅनेजर यांच्याकडून सातत्याने तलवाडा व परिसरातील सर्व वाड्या वस्त्या विविध गावातील खातेदार शेतकऱ्यांसह इतर शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या लाभार्थ्यांची अडवणूक करून निराधारांना हिन वागणूक देण्याच्या घटना अनेकदा घडल्या आसल्याचे बोलल्या जात असुन. अनेकदा राजकीय क्षेत्रातील व्यक्तींसोबत बाचाबाची चे प्रकारही घडून आले आहेत.**

इतर सर्वसामान्य खातेदारांनाही अनेकदा उडावा उडवीच्या उत्तरांना सामोरे जावे लागले आहे. या अगोदर अनेक अधिकारी होऊन गेले मात्र सर्वांना समान न्याय देण्याबरोबरच त्यांची अडवणूक होऊ नये म्हणून दक्षता घेतली जात होती. मात्र सध्या कार्यरत असलेल्या या बँकेच्या मॅनेजर मुळेच येथील बँकेची बदनामी होवु लागली असल्याचे चित्र दिसत आहे.याबाबत अधिक वृत्त असे की तलवाडा या ठिकाणी असलेल्या महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखेचे मॅनेजर यांच्या हेकेखोर पणामुळे ग्राहकांना, खातेदारांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. हे मॅनेजर बँक म्हणजे स्वतःची मक्तेदारीच असल्याचा आव आणत असल्याने बँक कर्मचारीही कामात टाळाटाळ करण्याचे प्रकार वाढले आहेत. या बँकेतील खातेदारांना कर्मचाऱ्यांकडून अरेरावीची भाषा वापरण्याचे मोठे प्रकार घडले आहेत. दोन दोन तीन तीन वर्षे एकाच जागेवर काम करत असल्याने येथील जुन्या कर्मचाऱ्यांना तातडीने या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलविणे आवश्यक आहे. त्यामुळे आपली बँक चांगली बँक आपल्या हक्काची बँक हे अभिमानाने सांगण्यासाठी सोयीचे होईल. शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्नविचारले असता उडवाउडवीची उत्तर या मॅनेजर कडुन मिळत असल्याचे ऐकन्यास मिळत आहे. आम्ही आमच्या कामांपेक्षा शेतकऱ्यांच्या व इतर सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी बँकेत जात असतो.सहा सहा महिने शेतकऱ्यांच्या फाईल्स जागच्या जागी पडुन असतात.त्याची दखल घेतली जात नाही.काही महिन्यांपूर्वी आम्ही याबाबतीत विचारणा करण्यासाठी गेलो होतो.मात्र आम्हाला उलट सुलट उत्तरे दिल्या गेल्याचे शेतक-यांचे म्हणने आहे.

आम्ही सामाजिक कार्य करताना शेतकऱ्यांसाठी व जनसामान्य खातेदारांच्या हितासाठी सतत कोणत्या ना कोणत्या कार्यालयात जाऊन त्या शेतकऱ्यांना व सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत असतो. मागील वेळी काही शेतकऱ्यांना येथील महाराष्ट्र बँकेच्या मार्फत पिककर्जाच्या फाईल साठी बँकेत जाण्याचा योग आला. त्यावेळी या मॅनेजर ने चक्क वेगळाच तोरा दाखवून दिला. गोर गरीब सर्वसामान्य शेतकरी राजा आपल्या शेतातील पिक कर्जासाठी सातत्याने प्रयत्न करतो आहे यांचं काही एक देणंघेणं या मॅनेजरला नसते. तो त्यांच्याच तो-यात असताो. आम्हाला मागील काही दिवसांपूर्वी या मॅनेजरचा अनुभव आला आहे. नक्कीच अशा अधिकाऱ्यांमुळे बँकेची बदनामी होवु लागली असुन याला कुठेतरी आवर घालण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन दक्षता घेण्याची गरज असल्याचे मत शेतकरी संघटनेचे बीड जिल्हा युवा उपाध्यक्ष, शेख खिजरभाई सौदागर यांनी आमच्या प्रतिनिधिशी बोलतांना व्यक्त केले

# गुन्ह्यातील ३ तिन्ही आरोपीची जामीन मंजूर –अँड गणेश कोल्हे

गेवराई ।प्रतिनिधी

मौजे ताकडगाव येथील कैलास अंकुशराव माने यांच्या फिर्यादी वरून मुक्ताराम मोटे,राहुल चाळक, नारायण चाळक यांच्या विरुद्ध गेवराई पोलीस स्टेशन येथे उठ.छे २३२/२०२४. कलम ३०७ १२०( ब )३२३,२२४,३४१,४२७.प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सविस्तर वृत्त असे की दिनांक २१/५ /२०२४ रोजी दुपारी साडे तीन वाजेच्या सुमारास फिर्यादी नामे कैलास अंकुशराव माने यांना आरोपी मुक्ताराम मोटे,राहुल चाळक, नारायण चाळक यांनी कोयत्याने वार करुन जीवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण केले बाबत पोलीस स्टेशन गेवराई येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपीच्या वतीने मा.बीड



जिल्हा न्यायालयत अँड गणेश कोल्हे यांच्या मार्फत जामीन अर्ज दाखल करण्यात आला होता.त्यामध्ये अँड कोल्हे यानी अचूकपणे व्यक्तिवाद केल्याने आरोपी यांना मा.बीड जिल्हा न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला.

# बीडमध्ये सासू-सूना, जावा-जावा करणार एकत्र नृत्य

## तेजस्वीनी ग्रुपचा पुढाकार : पंछी बनू उडती फिरू मस्त गगन में कार्यक्रम

**बीड ।प्रतिनिधी**

**बीडमधील तेजस्वीनी ग्रुपने महिलांसाठी हक्काचे व्यासपिठ उभा करून दिले आहे. आता खास महिलांसाठी पंछी बनू उडती फिरू मस्त गगन में हा कार्यक्रम आयोजित केला आहे. यात सोलोसह जोडी नृत्य स्पर्धा घेतली जाणार आहे. यात नाव नोंदणी करण्याचे आवाहन अध्यक्षा सोनल अरविंद पाटील यांनी केले आहे.**

बीड मधील महिलांना अंगी कला असतानाही केवळ व्यासपिठ नसल्याने व्यक्त होता येत नाही.



आपली कला सादर करता येत नाही. परंतू महिलांची हीच इच्छा लक्षात घेता तेजस्वीनी ग्रुपच्या अध्यक्षा सोनल पाटील यांनी खास महिलांसाठी सोलो आणि जोडी नृत्य स्पर्धांचे आयोजन केले आहे. यामध्ये सोलो नृत्यात १८ वर्षांवरील मुली, महिला सहभागी होऊ शकतात. तर जोडी तुझी माझी यामध्ये मैत्रिणी, जावा-जावा, सासू-सुना, आई-मुलगी, नणंद-भावजाई असे कोणीही सहभागी होऊ शकतात. ही स्पर्धा जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात होणार आहे. ज्यांना यामध्ये सहभाग घ्यायचा असेल, त्यांनी अध्यक्षा सोनल पाटील यांच्याशी संपर्क (मो.७०२०४१९४७०) साधावा, असे आवाहन तेजस्विनी ग्रुप अध्यक्ष सोनल पाटील यांनी केले आहे.

# मा एकनाथजी शिंदे मुख्यमंत्री साहेब महाराष्ट्र राज्य मुंबई

धारुर ।प्रतिनिधी

आदिवासी कोळी बांधवांनी जातवैधता प्रमाणपत्र जातप्रमाणपत्र मिळण्यासाठी बोलवली होती ती बैठक काही ?मुळे रद झाली आहे म्हणून आदिवासी कोळी बांधवांनी केली माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्याकडे जात प्रमाणपत्र जात वैधता बैठक घेऊन आदिवासी कोळी समाजाच्या विद्यार्थ्याचे महाराष्ट्रातील आदिवासी कोळी महादेव कोळी . कोळी मल्हार कोळी ढोर / टोकरे कोळी जमातीच्या जात प्रमाण पत्र व जातवैधता प्रमाण पत्राचा प्रश्न सोडवण्यासाठी दिनांक २८/०६/२०२४ रोजीची रद्द केलेली बैठक तातडीने लावण्याबाबत सर्व आदिवासी बांधव यांच्या कडून बैठक तातडीने लावून जातप्रमाणपत्र जातवैधता



काढण्यासाठी लवकरच हा प्रश्न तुम्ही लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी बैठक घेऊन तोडगा काढला पाहिजे असा आदिवासी कोळी समाजाच्या विद्यार्थी कडून मागणी होत आहे , आदिवासी कोळी जमातीचे प्रश्न सुटावे म्हणून आपण प्रामाणिक प्रयत्न करीत आहात त्या बद्दल आम्ही आपले तथापी आपण आपल्या दालनात दिनांक २८/०६/२०२४ रोजी आदिवासी कोळी महादेव कोळी मल्हार कोळी ढोर / टोकरे कोळी जमातीच्या प्रश्नांसाठी आयोजित बैठक काही आमदारांनी रद्द केली . आम्ही

आदिवासी कोळी महादेव . कोळी मल्हार . कोळी ढोर / टोकरे कोळी जमाती मधील असतांना सुद्धा आम्हा विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळत नसल्याने शैक्षणिक व नोकरीच्या संविधानिक लाभापासून मुकावे लागत आहे.वैधतेच्या नावा खाली कोळी महादेव . कोळी मल्हार . कोळी ढोर / टोकरे कोळी जमात बांधवांच्या कत्तली सुरु आहेत.तरी आपणास की सदरची दि२८/०६/२०२४ ची रद्द बैठक आपण तातडीने पुन्हा बोलवावी ही आपणास सर्व आदिवासी कोळी समाजाच्या विद्यार्थ्यांकडून बैठक घेण्यासाठी मागणी केली जात आहे तरी आपण सर्व आदिवासी कोळी विद्यार्थ्यांचा विचार करून जातवैधता व जातप्रमाणपत्र काढण्यासाठी ही बैठक बोलून प्रश्न लवकर मार्गी लावा अशी मागणी सर्व आदिवासी कोळी विद्यार्थ्यांकडून केली जात आहे व तसेच आदिवासी कोळी बांधवांना जातवैधता जातप्रमाणपत्र काढण्यासाठी अन्य होत असलेला कुठेतरी थांबला पाहिजे अशी मागणी वाल्हे गंगाधर यांच्या कडून केली जात आहे

# बुवा आठ दिवसावर आली वारी ,झाली का तयारी !

## एकनाथ महारांचाही हलकरा आला बरं ! वारक-यांना लागले पायी वारीचे वेध !

**पाऊस आला पेरण्या झाल्या ,भक्तांचा सागर लोटणार पंढरीला !**

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

आषाढी एकादशी आली कि वारक-यांना पंढरीचे वेध लागतात त्यात ज्ञानोबा तुकोबाचा पालखी सोहळा म्हणजे चालता महाकुंभ मानला जातो अवघ्या आठ दिवसावर प्रस्थान सोहळा आल्याने बुवा आठ दिवसावर आली वारी ,झाली का तयारी असे विचारू लागले आहे ,तालुक्यातून संत एकनाथ महाराजांची पालखी जात असते ,त्यांचाही हलकरा आला बरं असे म्हणू लागले .यंदा पाऊस झाला पेरण्या झाल्या असल्याने पंढरीला भक्तांचा सागर लोटला जाईल असे चित्र दिसून येत आहे .

ज्ञानेश्वर महाराजांचे पालखी प्रस्थान २९ जून रोजी तर संत तुकोबा २८ जूनला पंढरीकडे मार्गस्थ होणार आहे त्याचबरोबर पैठणहून संत एकनाथ महाराजांची पालखी तालुक्यातून जात असल्याने वारकरी त्यात देखील सहभागी होत असतात .लाखो भाविकांना बरोबर घेऊन ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता पायी चालत आणि ज्ञानोबा तुकाराम भजन करत पंधरा विस द्विस चालत राहणारे वारकरी आणि त्यांना बळ देणारा विठूराया हे अदभुत रसायण प्रतिवर्षी अनुभवला येते .गरजपुरते साहित्य घेऊन वारकरी प्रस्थान सोहळ्याला हजर होतात .संतज्ञानोबा ,तुकोबा ,मुक्ताबाई , एकनाथ महाराज ,निवृत्तीनाथ ,सोपान काका या



प्रमुख पालखी सोहळ्यासह श्रीक्षेत्र भगवान गड ,श्रीक्षेत्र नारायण गड ,श्रीक्षेत्र गहिनाथ गड ,मच्छेंद्र गड आदी दिंड्याबरोबर हजारो भाविक पंढरपुरला पायी चालत जात असतात ,या वर्षी त्यात मोठी वाढ होईल असे बोलले जाते .माऊली पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी प्रतीवर्षी तालुक्यातील ज्ञानेश्वर आश्रमाचे महंत नारायण महाराज डीसले यांचेबरोबर देखील तालुक्यातून मोठ्या संख्येने वारकरी सहभागी होत असतात ,यावर्षी संख्या वाढेल असे नारायण महाराज यांनी सांगितले.संत महादेव कासार दिंडी क्रमांक १२५ चे चालक गिरीष अंभोरे यांनी सर्व तयारी झाली असुन सर्वाच्या सुविधेची विशेष काळजी घेतली जाणार असल्याचे सांगितले.



# समाजसेवक गजानन महाराज मारणे यांचा वाढदिवस आदर्श उपक्रमातून साजरा

नाळवंडी । प्रतिनिधी

पुणे शहराचा बुलंद आवाज, महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेले समाजसेवक मा.गजानन महाराज मारणे यांचा वाढदिवस पुणे या ठिकाणी काल मोठ्या आदर्श उपक्रमातून साजरा झाला !! त्याच वाढदिवसाचे औचित्य साधून समाजसेवक गणेश गोरे यांनी गजानन मारणे यांच्या वाढदिवसा निमित्त बिड शहरातील पाली या ठिकाणी अनाथाचे केंद्रबिंदू समजले जाणारे इन्फंट इंडिया (आनंदग्राम) येथे विद्यार्थ्यांना शालेय जीवनामध्ये महत्त्वपूर्ण असलेले शैक्षणिक साहित्य वाटप करून,आणि फळ वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला,,,या आदर्श उपक्रमाने नक्कीच हे अनाथ विद्यार्थी घडतील..गणेश गोरे यांनी राबवलेला उपक्रम प्रेरणा दायी आहे.




**भिमाशंकर शुगर मिल्स चे जनरल मॅनेजर परदेशी साहेब यांचा वाढदिवस साजरा करताना , प्रभाकर विधाते,कुलकर्णी,विष्णुदास तांदळे, मचिंद्र औताडे,नवनाथ आखाडे,आनंद शेटे, गिरिश मोरे, जितेन्द्र कांबळे,ऋषिकेश विधाते ,पठान,वाघिरे, आटुळे, व सर्व कर्मचारी वर्ग**

# वाहेगाव आमला येथे शेतीच्या सामुदायिक बांधावरील लिंबाचे झाडे तोडून व्यापाऱ्याला विकले!

## याप्रकरणी चार जणांविरोधात तलवाडा पोलिसात तक्रार दाखल

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : पर्यावरणाचे रक्षण हे सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. झाडांपासूनच आपल्याला आरोग्यविषयक आणि उपयोगी गोष्टी मिळतात. पर्यावरणावर घात करत लालसेपोटी माणूसच झाडांची विक्री करू लागला आहे. गेवराई तालुक्यातील वाहेगाव आमला शिवारातील एका शेतकऱ्याच्या सामुदायिक बांधावरील मोठ मोठाले दोन लिंबाचे झाडे तोडून ते एका व्यापाऱ्याला विकले असल्याचा प्रकार घडला आहे. वाहेगाव आमला येथे दि.१३ जून रोजी हा प्रकार उघडकीस आला होता.

याप्रकरणी भागवत शिवाजी खेत्रे यांनी दि.१७ जून रोजी तलवाडा पोलिसात तक्रार दाखल केली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, तक्रार भागवत खेत्रे यांची गेवराई तालुक्यातील वाहेगाव



आमला येथे ३६७ या गटनंबरमध्ये शेती आहे. त्या शेतीच्या सामुदायिक बांधावरील मोठमोठे सहापैकी दोन लिंबाचे झाडे तोडून त्याची पिंपळनेर येथील एका व्यापाऱ्याला विकले आहे. याची विचारणा केली असता, यामध्ये तुझा काही संबंध नाही. राहिलेले झाडे देखील आम्ही तोडणार आहे. तुझ्या मोजणीच्या नकाशावर लिंबाच्या नोंदी आहेत. पण तु काहीही करणार नाही. सदरील लिंबाचे झाडे दादागिरी करून तसेच धमकी देऊन आणि कायदा हातात घेऊन आम्हाला मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचे फिर्यादीने सांगितले. याप्रकरणी भागवत खेत्रे यांच्या तक्रारीवरून रामप्रसाद खेत्रे, राधाकिसन खेत्रे, हरि खेत्रे, तुकाराम खेत्रे यांच्याविरोधात तलवाडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# वडवणीच्या तिगाव मध्ये अनेक वर्षापासून विद्यार्थ्यांसाठी बस सेवा सुरु

## विद्यार्थी विद्यार्थिनी ग्रामस्थांच्या वतीने एसटी वाहक कंडक्टर यांचा सत्कार संपन्न

**वडवणी ।प्रतिनिधी**

**बीडच्या वडवणी तालुक्यातील तिगाव येथील विद्यार्थी विद्यार्थिनीना महाविद्यालयात जाण्यासाठी मागच्या अनेक वर्षापासून सामना करावा लागत होता, महाविद्यालयात जाण्यासाठी अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित होते,**

एसटी परिवहन महामंडळाने आज गावामध्ये एसटी चालू केली यावेळी समस्त ग्रामस्थांच्यावतीने विद्यार्थ्यांच्या एसटी वाहक कंडक्टर यांचा ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांनी सत्कार केला, यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण झाले





अंबाजोगाई ।प्रतिनिधी

तालुक्यातील धानोरा (बु.) येथील जि.प.मा. शाळेत बार्टीच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती निमित्त नुकतीच निबंध स्पर्धा घेण्यात आली. २६ जुन ते २ जुलै या कालावधीत सामाजिक न्याय विभागा अंतर्गत सप्ताह सुरू असून त्या अंतर्गत तालुक्यातील धानोरा (बु) येथील जि.प.मा. शाळेत घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक पिसाळ होते. प्रमुख पाहुणे समतादूत व्यंकटेश जोशी, सामाजिक कार्यकर्ते विनायक जाधव आदी उपस्थित होते. संचालन सहशिक्षक माळी यांनी केले. या निबंध स्पर्धा बार्टीचे महासंचालक सुनील वारे विभाग प्रमुख, प्रकल्प अधिकारी समतादूत प्रकल्प जिल्हा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. यावेळी शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# निवडणूक खर्चचा ताळमेळसाठी पुनर्मेळ बैठकीचे आयोजन दि. ३० जुनला

बीड (प्रतिनिधी)

निवडणूक खर्च संनियंत्रणाच्या अनुदेशाप्रमाणे निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या लेख्यांची तपासणीची कार्यपध्दती विशद केलेली आहे. त्याप्रमाणे सारसंग्रह जोडपत्र सी-१० व सी-१२ नुसार निकालाची घोषणा केल्याच्या नंतर २६ व्या दिवशी जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेकडून आयोजीत करण्यात आलेल्या लेखा पुनर्मेळ बैठकीमध्ये उमेदवारास निवडणूक खर्चासाठी नमूद केलेल्या रक्कमेचा कोणतीही तफावत असल्यास पुनर्मेळ घालण्याची दुसरी संधी देण्यात येते. त्यामुळे उमेदवार त्यांचे निवडणूक प्रतिनिधी त्यांच्या निवडणूक खर्चाच्या खात्यामध्ये निवडणूक खर्चाच्या

बाबी संदर्भात काही विवाद असेल तर निवडणूकीच्या कालावधीमध्ये गोळा केलेल्या पुराव्यासह मेळ घालू शकतात. निवडणूक निर्णय अधिकारी तशी नोटीस निर्गमीत करतात. अशी तरतूद आहे.

# गुजरातने महाराष्ट्राला मागे टाकले

## राज्यासाठी धक्कादायक बातमी ; टॉप ५ मधून बाहेर फेकलो गेलो

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी २०२३-२४चा आर्थिक पाहणी अहवाल सादर करण्यात आला. या अहवालातून अनेक धक्कादायक माहिती समोर आली आहे.

उद्योग आणि आर्थिक गुंतवणुकीत महाराष्ट्राशी स्पर्धा करणाऱ्या गुजरातने दरडोई उत्पन्नात महाराष्ट्राला मागे टाकल्याची धक्कादायक बाब राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालातून उघड झाली आहे. २०२२-२३ मध्ये दरडोई उत्पन्नात पाचव्या स्थानी असलेले महाराष्ट्र राज्य या स्थानावरून घसरत सहाव्या स्थानावर फेकले गेले असून गुजरातने दरडोई उत्पन्नात पहिल्या पाचमध्ये मानाचे स्थान मिळवले आहे. राज्याच्या कृषी आणि संलग्न कार्य क्षेत्रात १.९ टक्के वाढ अपेक्षित होती. मात्र गेल्या वर्षीच्या तुलनेत तृणधान्य, कडधान्ये, तेलबिया, ऊस यांच्या उत्पादनात अनुक्रमे २३ टक्के, १० टक्के, २ आणि १७ टक्के इतकी घट अपेक्षित असल्याने राज्याची चिंता वाढली आहे. याशिवाय



राज्यावरील कर्जात १६.५ टक्के इतकी वाढ झाल्याची माहिती अहवालात देण्यात आली आहे.

सन २०२३-२४ मध्ये देशाच्या आणि राज्याच्या अर्थव्यस्थेतील वाढ प्रत्येकी ७.६ टक्के असेल, असा अंदाज पाहणीत व्यक्त करण्यात आला आहे. सुधारित अंदाजानुसार २०२३-२४ साठी राज्याची महसुली जमा ४ लाख ८६ हजार १६ कोटी असून महसुली खर्च ५ लाख ५ हजार ६४७ कोटी आहे. गेल्या आर्थिक वर्षात फेब्रुवारीपर्यंत प्रत्यक्ष महसुली खर्च ३ लाख ३५ हजार ७६१ कोटी रुपये असल्याचे अहवालात म्हटले आहे. मार्च २०२४ अखेर राज्यावरील कर्जाचा आकडा ७ लाख ११ हजार २७८ कोटी रुपयांवर पोहचला असून कर्जाचे प्रमाण स्थूल राज्य उत्पन्नाच्या २५ टक्के आहे. याशिवाय राज्यावरील कर्जात १६.५ टक्के इतकी वाढ झाल्याची माहिती देण्यात आली आहे. मार्च २०२३ अखेर राज्यावर ६ लाख ४९ हजार ६९९ कोटी रुपये इतके कर्ज असेल.

# माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम घेऊन साजरा

बीड । प्रतिनिधी

चाळीस वर्ष भारतीय सैन्यात सेवा बजावल्यानंतर माजी सैनिक प्रकाश वाघमारे निवृत्तीच्या नंतरही आपला समाजसेवेचा वसा कायम ठेवला आहे.समाज हिताचे प्रश्न घेऊन वेळोवेळी आंदोलने, धरणे उपोषणे केली आहे. समाज हिताच्या चळवळीत साठी योगदान देत आहेत.त्यांनी देश सेवेनंतर समाजसेवेचे वृत्त हातीती घेतले आहे. समाजाप्रती आपण काही तरी चांगलं करायचं आहे ही भावना कायम. माजी सैनिका प्रकाश वाघमारे यांनी त्यांचा वाढदिवस आगळ्यावेगळ्या प्रकारे साजरा केला .वासनवाडी परिसरात असलेल्या रामगड येथील आदिवासी समीकरणे येथील अनाथ बालकासमवेत आपला वाढदिवस साजरा केला.अनाथ, निराधार,



वंचित उपेक्षित मुला मुलींसाठी एक महिना पुरेल एवढे किराणा सामान त्यांनी यावेळी भेट दिली.सहकुटुंब सहभागी होऊन परिसरामध्ये वृक्षारोपणही केले. एक आगळावेगळा उपक्रम राबवला. यावेळी त्यांनी असे सांगितले की महापुरुषांचे अनुकरण करून मुलांनीही मोठे बनाव व जिल्ह्याचं व आदिवासी समीकरण

# युगप्रवर्तक राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक क्रांतीसह शैक्षणिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली - प्रा.दिलीप चव्हाण यांचे प्रतिपादन

बीड । प्रतिनिधि

युगप्रवर्तक राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक क्रांतीसह शैक्षणिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली असे प्रतिपादन प्रा.दिलीप चव्हाण यांनी केले. तसेच मानवी जीवनाचा दर्जा, साक्षरता, कामाचा दर्जा यासह मराठवाड्याची सध्याची परिस्थिती आणि उद्योग व्यवसाय यावर भाष्य करत आपले मत व्यक्त केले. राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त संचालक, स्कूल ऑफ लँग्वेज लिटरेचर आणि सांस्कृतिक अभ्यास एस. आर. टी. एम. विद्यापीठ नांदेड प्रा.दिलीप चव्हाण यांच्या व्याख्यानाचे आयोजन दिनांक २६ जून २०२४ रोजी सकाळी ११ वाजता देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने करण्यात आले होते.



याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठान बीड संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे यांची उपस्थिती होती. यावेळी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड प्राचार्य प्रा.डॉ.एल.एम. थोरात, उपप्राचार्य प्रा. डी.जी. निकाळजे, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड प्राचार्य प्रो.डॉ.अशोक धुलधुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना प्रा. दिलीप चव्हाण म्हणाले की, शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती, वसतिगृह काढले तसेच तत्कालीन अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश काढून समानतेचा संदेश दिला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्यांना शैक्षणिक सवलत म्हणून फी माफीचा निर्णय घेतला. कोल्हापूर संस्थानातील मागासलेल्या जातींच्या विद्यार्थ्यांना फी माफी आणि मोफत शिक्षण उपलब्ध करून दिले राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच वेदोक्त प्रकरण आणि शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानगाव येथील परिषदेतील काही महत्त्वपूर्ण प्रसंग सांगितले. अध्यक्षीय भाषणामध्ये प्रा.प्रदिप रोडे यांनी शाहू महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकला आणि तुलसी शैक्षणिक समूहाच्या माध्यमातून महापुरुषांच्या विचारांची पेरणी केली जाते असे सांगत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तुलसी शैक्षणिक समूह परिश्रम घेत आहे असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.योगिता लांडगे यांनी मानले.

## छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त

# ऑल इंडिया पँथर सेना बीड च्यावतीने विविध उपक्रम राबवून जयंती साजरी

पाटोदा ।प्रतिनिधी

राजर्षी शाहू छत्रपती महाराज महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्रांतीचे अग्रदूत आहेत. जातीय विषमते विरूध्द व उच्चनीचते विरूध्द बंड पुकारून सामाजिक समता स्थापन करणारा लोककल्याणकारी राजा..! महाराष्ट्राच्या समाजिक चळवळीचे नेतृत्व स्वीकारून पददलित समाजाला जागे करून त्यांच्यामध्ये स्वाभिमानाची ज्योत पेटवण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्यही त्यांनीच केले. महाराष्ट्राला मार्गदर्शन करत असतानाच तत्कालीन कोल्हापूर राज्याचा सर्वांगीण विकास या महामानवाने घडविला. राजर्षी शाहू छत्रपती महाराजांच्याच काळात



प्राथमिक शिक्षण घराघरात गेले. उद्योगधंद्यांना भरभराट आली. नवनवीन पेठा वसविण्यात आल्या. शेती व्यवसायाच्या विकासावर आपली आर्थिक प्रगती आहे हे जाणून शेती व्यवसायास उद्योगीकरणाची जोड दिली, तरच आपली चांगली प्रगती होईल असा विचार ते सातत्याने बोलून दाखवत असत. यासाठी शेतीपूरक व्यवसायांना चालना देण्यासाठी महाराजांचे सदैव प्रयत्न असत.

कला व क्रीडागुणांची जोपासना होणे आवश्यक आहे, हे ओळखून कलावंतांना, चित्रकारांना, संगीततज्ज्ञांना, शाहिरांना व मल्लांना त्यांनी राजाश्रय दिला. राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या राजर्षी शाहू छत्रपती महाराजांना जयंती दिनी त्रिवार मुजरा !ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने बीड शहरांमध्ये जिव्हाळा बेघर निवारा आश्रम या ठिकाणी अन्नदान व वृक्षरोपण करून जयंती साजरी केली तसेच बेगर अनाथ विद्यार्थ्यांना पसायदान सेवा प्रकल्प या ठिकाणी शालेय साहित्य वाटप करण्यात आली. यावेळी उपस्थित ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, रोशन धिवार, राजेश चव्हाण, आकाश देवकते पाटील, मधुसूदन मस्के पाटील, सुरज सोनवणे व संघटनेतील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# धानोरा (बु.) येथील जि.प. माध्यमिक शाळेत निंबध स्पर्धा संपन्न

**अंबाजोगाई ।प्रतिनिधी धानोरा (बु.) येथील जि.प. माध्यमिक शाळेत बार्टी च्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती निमित्त निबंध स्पर्धा संपन्न झाली. बार्टी च्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या १५० व्या जयंती निमित्त २६ जून ते २ जुलै या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक न्याय दिन समेलन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्त बार्टी च्या समतादूत प्रकल्प अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.**



या अंतर्गत धानोरा (बु) येथील जि.प.माध्यमिक शाळेत अंबाजोगाई तालुक्यातील समतादूत व्यंकटेश जोशी यांनी निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाची सुरुवात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. पिसाळ सर होते. तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून समतादूत व्यंकटेश जोशी हे उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते विनायक जाधव या प्रसंगी विचार मंचावर उपस्थित होते. श्री.जोशी यांनी यावेळी मार्गदर्शन करत शाहू महाराजांचा जीवन परिचय करुन दिला. तसेच निबंध स्पर्धेची रूपरेषा विद्यार्थ्यांना समजून सांगितली. या निबंध स्पर्धेला शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक श्री. माळी सर यांनी केले.

हा कार्यक्रम बार्टी चे महासंचालक श्री.सुनील वारे सर, विभाग प्रमुख, प्रकल्प अधिकारी समतादूत प्रकल्प जिल्हा बीड यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आला. कार्यक्रमासाठी शाळेचे विद्यार्थी, पालक, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टी मतदार संघासाठी आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन

पाटोदा ।प्रतिनिधी

आष्टी पाटोदा विधानसभा मतदारसंघांमधील शहरालगत वाहणाऱ्या प्रमुख नद्या त्याचबरोबर छोट्या खेडेगावातून वाहणाऱ्या मोठ्या नद्या यामुळे नदीपात्रालगत शहराची मुख्य बाजारपेठ त्याचबरोबर मंदिर परिसर तसेच स्थानिक रहिवासी आपत्कालीन परिस्थितीमध्ये नदीच्या वाढत्या पाण्यामुळे पुराचा मोठ्या प्रमाणावर होणारा धोका लक्षात घेता यावर कायमस्वरूपी उपाययोजना

म्हणून आष्टी मतदारसंघासाठी संरक्षण भिंत उभारणे यासाठी महाराष्ट्र शासनाने १६ कोटी रुपये निधी मंजूर केला आहे असल्याची माहिती आ. सुरेश धस यांनी दिली आहे. या मध्ये आष्टी शहरातून वाहणाऱ्या तलवार नदीच्या पात्रास दुतर्फा संरक्षण भिंत बांधकाम करणे ५ कोटी रु. मौजे वाळुंज ता. आष्टी येथे तलवार नदीलगत भैरवनाथ मंदीर परिसरास संरक्षण भिंत बांधकाम करणे ३ कोटी रु. पाटोदा शहरातूर जाणाऱ्या मांजरा नदीच्या पात्रास दुतर्फा संरक्षण भिंत बांधकाम करणे ५



कोटी रु. तर मौजे अमळनेर ता. पाटोदा येथे गावलगत जाणाऱ्या लेंडी नदीच्या पात्रास बाजारतळ परिसरास संरक्षण भिंत बांधकाम करणे ३ कोटी रु. असे एकूण १६ कोटी रुपये मंजूर केले असल्याची माहिती आ. सुरेश धस यांनी दिली. यावेळी आ. धस यांनी आपत्ती व्यवस्थापन महाराष्ट्र शासन, बीड जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण बीड व बीड पाटबंधारे विभागाचे विशेष आभार मानले आहेत.

# सकाळी शाळा ;दुपारी व्यवसायात मदत करतच अभ्यास

## परळीचा शाळकरी मुलाचे सर्वत्र कौतुक

परळी / प्रतिनिधी

परिस्थिती हीच मानवाला सर्वात मोठं शिक्षण देत असते याची प्रचिती पुनः एकदा अनुभवयास आली.घरची बिकट परिस्थिती मात्र शिक्षण सोडायच नाही हाच ध्यास उराशी बाळगून शाळा संपल्यावर आपल्या वडिलांच्या व्यवसायात वडिलांना मदत करत शाळेचा अभ्यास पूर्ण करत शिक्षण घेणाऱ्या शाळकरी मुलागा शहरात चर्चेचा विषय बनला आहे.

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो प्राशन

करतो तो गुरगुरल्या शिवाय राहत नाही ही जिद्द उराशी बाळगून प्रतिकूल परिस्थितीत देखील येणाऱ्या संकटावर मात करत आपले शिक्षण पूर्ण करणारा दीपक उर्फ रोहन मुंडे हा मुलगा शहरात चर्चेत आला आहे. दीपक मुंडे याचा वडिल शहरातील प्रभू वैद्यनाथ मंदिर पायऱ्यांच्या जवळ रस्त्यावर बेल-फुल विक्रीचा व्यवसाय करतात. दीपक हा इयत्ता ६ मध्ये शिक्षण घेत असून दररोज तो शाळा सुटल्यावर आपल्या आई-वडिलांना



त्यांच्या कामात मदत करण्यासाठी रस्त्यावर मांडलेल्या दुकानात येऊन बसतो.ज्यावेळी भाविक कमी असतात दुकानात बेल-फुल खरेदीला गिऱ्हाईक नसते असा वेळी तो आपल्या शाळेतील दिलेला गृहपाठ, शाळेचा अभ्यास पूर्ण करतो. मागील अनेक वर्षापासून दीपक याच पद्धतीने आपल्या आई-वडिलांना मदत करत आपले शिक्षण पूर्ण करत आहे.

देशाला नवी दिशा देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रस्त्यावरील दिव्यांच्या खाली बसून अभ्यास केल्याचं अनेक पुस्तकातून आपण वाचतो. अनेक क्रांतिकारकांनी तर तुरुंगातील प्रतिकूल परिस्थितीत पुस्तकं लिहिली. यावरून एवढच लक्षात येतं की, माशाचा डोळा हेच जर तुमचं लक्ष्य असेल तर आजूबाजूच्या कोणत्याच गोष्टींचा परिणाम होऊ शकत नाही.

# अमित शाह महाराष्ट्रात येणार

## विधानसभेपूर्वी भाजपमध्ये हालचालींचे संकेत

कोण कुणावर राजकीय कुरघोडी करणार?

महाराष्ट्रात भाजपला लोकसभा निवडणुकीत अपयश आल्यामुळे भाजपमध्ये खळबळ उडाली आहे. भाजपच्या महाराष्ट्रात सर्वाधिक जागा जिंकून येतील, असा अंदाज भाजपच्या केंद्रातल्या नेत्यांचा होता. पण महाराष्ट्राच्या जनतेने भाजपच्या फोडाफोडीच्या राजकारणाला मतदानाचा माध्यमातून सडेतोड उत्तर दिलं. लोकसभेत झालेल्या हानीची पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत होऊ नये यासाठी भाजप नेते जंगजंग पछाडताना दिसत आहेत. विशेष म्हणजे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आता महाराष्ट्रात भाजपची पुन्हा सत्तेची घडी बसवण्यासाठी येणार आहेत. त्यामुळे भाजपच्या गोटात आगामी काळात मोठ्या उंचीच्या घडामोडी घडण्याची शक्यता आहे. या घाडमोडींमधून कोण कुणावर राजकीय कुरघोडी करणार हे आगामी काळात स्पष्ट होईलच. पण अमित शाह यांच्या 'चाणक्य'नीतीमध्ये भाजपच्या कोणकोणत्या नेत्यांना मोलाची जबाबदारी मिळते? ते पाहणं देखील औत्सुक्याचं ठरणार आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात आता मोठ्या घडामोडी घडणार आहेत. कारण महाराष्ट्राच्या राजकारणात केंद्रातील भाजपचे दिग्गज नेते अमित शाह हे विशेष लक्ष देणार आहेत. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपला अनेक ठिकाणी पराभवाला सामोरं जावं लागलं. या पराभवाची जबाबदारी स्वीकारत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पक्षश्रेष्ठींकडे आपल्याला उपमुख्यमंत्रीपदापासून मुक्त करावं, अशी मागणीदेखील पक्षश्रेष्ठींकडे केली. या दरम्यान भाजपचं दिल्लीतलं हायकमांड हे केंद्रात सरकार स्थापन करण्याच्या कामात व्यस्त होतं. पण आता दिल्लीतलं भाजपचं हायकमांड महाराष्ट्रात विशेष लक्ष देण्याच्या तयारीत आहे. विशेष म्हणजे भाजपचे केंद्रातले 'चाणक्य' नेते तथा देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता महाराष्ट्रात येणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या घडामोडी फार महत्त्वाच्या आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गृहमंत्री अमित शाह राज्यातल्या विधानसभा निवडणुकीआधीच ॲक्शन मोडवर आले आहेत. अमित शाह हे जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमित शाहा यांच्या या दौऱ्याला जास्त महत्त्व प्राप्त झालं आहे.

भाजपच्या गोटात सध्या अनेक घडामोडी घडत आहेत. पुढच्या महिन्यात १३ जुलैला विधान परिषदेच्या ११ जागांसाठी निवडणूक होणार आहे. भाजपकडून विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी ११ नेत्यांच्या नावाचा विचार सुरु असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. लोकसभेच्या निवडणुकीत पराभूत झालेल्या पंकजा मुंडे, रावसाहेब दानवे, रासप नेते महादेव जानकर यांना विधान परिषदेसाठी भाजपकडून संधी देण्याबाबतची चर्चा सुरु असल्याची माहिती मिळत आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत ओबीसी, मराठा, धनगर असं जातीय समीकरण असणार आहे. पाच जागांमध्ये एका महिलेला संधी मिळणार हे निश्चित आहे. जातीय समीकरणे पाहून उमेदवारीवर अंतिम शिक्कामोर्तब होणार असल्याची माहितीदेखील सूत्रांनी दिली आहे.



फडणवीसांच्या 'सागर' बंगल्यावर उद्या महत्त्वाची बैठक

दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'सागर' या शासकीय निवासस्थानी उद्या संध्याकाळी भाजपच्या कोअर कमिटीची बैठक बोलवण्यात आली आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते भुपेंद्र यादव यांच्यासह सह प्रभारी अश्विनी वैष्णव देखील या बैठकीत उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत देवेंद्र फडणवीस, पंकजा मुंडे, चंद्रशेखर बावनकुळे, सुधीर मुनगंटीवार आणि इतर नेते उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र भाजपच्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वपूर्ण बैठक असणार आहे.

# मा.रत्नाकरराव गुट्टे इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रत्यक्ष सूर्यमालाच अवतारली!

सोनपेठ / प्रतिनिधी

दि.२७ जून रोजी ' रत्नाकरराव गुट्टे इंटरनॅशनल स्कूल,' वडगाव (स्टे.) ता. सोनपेठ जि.परभणी येथे इयत्ता ३ री ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी सूर्यमालेचे प्रत्यक्ष अनुभव देण्यात आले. ज्यामुळे त्यांनी सौर यंत्रणेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला . विद्यार्थ्यांनी सर्व ग्रहांच्या थेट हालचाली पाहून आकाशगंगेतील विविध घडामोडींचे निरीक्षण केले. आकाशगंगेतील सूर्य, बुध,शुक्र व पृथ्वी हे ग्रह पाहून विद्यार्थ्यांच्या डोळ्यात आनंद मावेनासा झाला.यामुळे त्यांना प्रत्यक्ष अनुभव घेण्याची अतुलनीय संधी मिळाली. चांद्रयानच्या सर्व मोहिमेची विस्तारित माहिती विद्यार्थ्यांना झाली. विद्यार्थ्यांना खगोलीय पिंडांचे, चांद्रयान मोहिमेचे आणि वैश्विक घटनांचे सर्व फुटेज पाहता आले. शैक्षणिक अँपचा वापर केल्यास



खगोल संकल्पना समजण्यास विद्यार्थ्यांना मदत होते.शाळा विद्यार्थ्यांना नवनवीन उपक्रमातून अध्ययन अनुभव देण्यासाठी प्रयत्नशील असते. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव तसेच शिक्षणातील नाविन्याचा आनंद घेता आला.या परस्परसंवादी आणि आकर्षक अनुभवाने त्यांची सौरमालेबद्दलची समज लक्षणीयरीत्या वाढली. गतिमान ग्रहांचे निरीक्षण करून आणि थेट प्रात्यक्षिके पाहून, विद्यार्थींच्या सौरमालेबद्दलची संकल्पना स्पष्ट आणि दृढ झाली. एकूणच स्कूलमध्ये आयोजन केलेल्या सौरमालेचे प्रात्यक्षिक अनुभव हा एक उत्कृष्ट शैक्षणिक अनुभव होता, ज्यामुळे विद्यार्थ्यांवर कायमची छाप पडली आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना ३ डी स्वरूपातील प्रक्षेपणाने विस्तारित ज्ञान प्राप्त झाले आहे. विद्यार्थी जीवनात पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षिक ज्ञान देखील अत्यंत महत्त्वाचे असते. याचे प्रत्यक्ष दर्शन मा. रत्नाकरराव गुट्टे इंटरनॅशनल स्कूलमध्ये पदोपदी पाहायला मिळते. तसेच अध्यापनामध्ये प्रत्यक्ष शिक्षणावर भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये असलेले उपजत कला, कौशल्य विकसित होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यासाठी शाळेमध्ये असे विविध उपक्रम राबविले जातात. असा विश्वास शाळेच्या अध्यक्षा सौ. स्वाती गुट्टे, मुख्य कार्यकारी अधिकारी दिपक फुंदे आणि शाळेचे मुख्याध्यापक कृष्णा तायडे यांनी व्यक्त केला.

# असदुद्दीन ओवैसींची खासदारकी रद्द करा

### नवनीत राणा आक्रमक, राष्ट्रपतींना लिहिलं पत्र

मुंबई (प्रतिनिधी)

लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर १८ व्या लोकसभेसाठी नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी पार पडला. त्यामध्ये, महाराष्ट्रातील बहुतांश खासदारांनी मराठीतून शपथ घेतली. तर, काहींनी हिंदीत शपथ घेतली. मात्र, अहमदनगरचे खासदार निलेश लंके यांनी इंग्रजीत घेतलेली शपथ सर्वात चर्चेत आणि लक्षवेधी ठरली. लंकेच्या शपथविधीचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला होता. तर, दुसरीकडे एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनीही घेतलेल्या शपथविधीचाही व्हिडिओ व्हायरल झाला होता. आता, खासदार ओवैसींच्या या शपथविधीच्या व्हिडिओवरुन त्यांची खासदारकी रद्द करण्याची मागणी केली जात आहे. माजी खासदार नवनीत राणा यांनी राष्ट्रपतींना पत्र लिहून ही मागणी केली आहे. तसेच, ओवैसींकडून भारतीय संविधानाचे उल्लंघन झाल्याचंही त्यांनी पत्रात म्हटलं आहे.



भाजप नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी असदुद्दीन ओवैसींच्या शपथविधीवरुन त्यांची खासदारकी रद्द करण्याची मागणी केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहून असदुद्दीन ओवैसींनी जय पॅलेस्टाईन म्हणत केलेल्या घोषणेस राणा यांनी आक्षेप घेतला आहे. भारतीय संविधानाच्या कलम १०२/१०३ नुसार असदुद्दीन ओवैसी यांची खासदारकी रद्द करण्यात यावी, असे त्यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.ओवैसी यांनी पद आणि गोपनियतेची शपथ घेताना, जय पॅलेस्टाईनचा नार देत आपली शपथ पूर्ण केली होती. त्यामुळे, देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी ही घातक बाब असून त्यांनी शपथ घेताना भारतीय संविधानाचे उल्लंघन केल्याचा आरोप राणा यांनी पत्रातून केला आहे.

१८ व्या लोकसभेच्या कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी -खचखच् प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी खासदार म्हणून शपथ घेतली. यादरम्यान त्यांनी संसदेत शपथविधी सोहळ्यात जय पॅलेस्टाईन म्हणत वाद निर्माण केला. प्रोटेम स्पीकर यांनी असुद्दीन ओवेसी यांना लोकसभा सदस्य म्हणून शपथ घेण्यासाठी बोलावले. बिस्मिल्लाचे पठण करून ओवैसी यांनी खासदार म्हणून शपथ घेतली. खासदार म्हणून शपथ घेताना त्यांनी 'जय भीम, जय तेलंगणा' आणि नंतर 'जय पॅलेस्टाईन'च्या घोषणा दिल्या. त्यानंतर भाजप खासदारांनी संसदेत गदारोळ सुरू केला होता. तर, सोशल मीडियातूनही त्यांच्या या शपथेवर टीका करण्यात आली.



धामणगाव (दादा पवळ)

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे माजी आमदार तथा विधान परिषदेचे सदस्य लोकनेते सुरेश आण्णा धस यांचा सहा वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाला.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भारतीय जनता पार्टी अध्यक्ष जे.पी.नड्डा तसेच देवेंद्रजी फडणवीस, भाजपा राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्या आशीर्वादामुळे बीड-लातूर - धाराशिव या कार्यक्षेत्राचा विधान परिषद सदस्य म्हूणन जबाबदारी मिळाली

# भांडणाची कुरापत काढून जीवघेणा हल्ला

परळी / प्रतिनिधी

जुन्या भांडनाची कुरापत काढून धारदार शस्त्राने जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्या प्रकरणी शहरातील संभाजी नगर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार मजुरी व्यवसाय करणारा संदेश बाळकृष्ण रोडे ( वय २५) हे त्याचा भाऊ व आईसह परळी येथील मिलिंद नगर भागात राहत असलेल्या मामाच्या भेटीला जात असताना मिलिंद नगर पाटी जवळ जुन्या भांडणाच्या कारणावरून तिघाजणांनी रोडे यांच्यावर तलवार, चाकु व लोखंडी रॉडने डोक्यात, पायावर मारून गंभीर जखमी करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

या प्रकरणी संदेश रोडे यांच्या फिर्यादीवरून संभाजी नगर पोलीस ठाण्यात गुरनं. १०७/२०२४ कलम ३०७,३२६,३२४,३४१,३ २३,५०४,५०६,३४ भादवी सह कलम ४/२५ शस्त्र कायद्यानुसार तिघाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिंदे हे करत आहेत.

# निसर्ग जपण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा -डॉ.हनुमंत सौदागर

केज/प्रतिनिधी

युवा ग्राम विकास मंडळ गेल्या २० वर्षापासून बोबाटी नदी विकास व पुनर्जीवना करिता काम करत आहे.दि.२७ जुन रोजी सर्वज्ञ करियर अकॅडमी केज येथे युवा ग्राम विकास मंडळ व इंडिया वॉटर पार्टनरशीप यांच्या संयुक्त विद्यमाने युथ लीडरशिप ट्रेनिंग प्रोग्राम घेण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सर्वज्ञ करियर अकॅडमीचे संचालक प्रा. दत्ता बांगर,प्रमुख मार्गदर्शक डॉ.हनुमंत सौदागर हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस संतोष रेपे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा समजावत जमलेल्या युवकांना पाठीमागील दोन वर्षापासून करत असलेल्या कामाबाबत उजळणी केली व पुढे आपण काय करणार आहोत याबाबत नियोजन सांगितले.प्रमुखमार्गदर्शक डॉ.हनुमंत सौदागर यांनी आपल्या मार्गदर्शनातून जमलेल्या युवकांना नैसर्गिक साधन संपत्तीच्या होत असलेल्या ऱ्हासा बद्दल चर्चा केली.आपणच आपल्या पर्यावरणाचाहोत असलेला ऱ्हास कसे रोखू शकतो व त्यावर काय उपाययोजना करायला हव्यात गावात बोबाटी नदी मधून वाहत जात असलेले पाणी कसे आडवलेपाहिजे,शासकीय योजना व इतर योजनांचा अंमलबजावणी करत असताना आपण त्यात कोणती भूमिका घेतली पाहिजे,गावातील तरुण एकत्र येऊन आपण पिण्याचा पाण्यावर व शेतीच्या पाण्यावर काय काय उपाय योजना करू शकतो यावर डॉ.हनुमंत सौदागर यांनी जमलेल्या युवकांना मार्गदर्शन केले. पाण्याविषयी जागरूक असणाऱ्या तरुण शेतकऱ्यांनी या बोबाटी नदीवरील बंधारे दुरुस्ती व पिण्याच्या पाण्याबद्दल सद्य स्थितीची माहिती दिली.शेतीच्या व पिण्याच्या पाण्याच्या जल स्त्रोतांचे बळकटीकरण करण्याकरिता युवकांचा सहभाग किती महत्वाचा आहे.व उद्याच्याशेतीवरील पाणी व्यवस्थापन हे युवकच करू शकतात. याबाबत युवा ग्रामविकास मंडळ युवकांना विविध प्रशिक्षणे देत आहे.युवा ग्राम विकास मंडळ नदी काठच्या दहा गावातून तीस युवकांचा गट तयार करून त्यांना जलस्त्रोतांचे पुर्नजीवन करण्यासाठी तज्ञ व्यक्तीकडून प्रशिक्षण देणार आहे.तसेच या युवकांची सहल देखील घेऊन जाणार आहे.अशी माहिती युवा ग्रामचे संतोष रेपे यांनी दिली.प्रा.दत्ता बांगर सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून जमलेल्या युवकांना नैसर्गिक संसाधन जोपासणे व ते टिकवून ठेवणे याबाबत मार्गदर्शन केले.शेवटी युवकांना प्रश्न उत्तरे विचारण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रकाश काळे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष रेपे संभाजी व इतर जण यांनी प्रयत्न केले.



श्री क्षेत्र गुंडा महाराज संस्थान देगलुर ते पंढरपूर प्रतिवर्षा प्रमाणे पायी दिंडी सोहळा श्री गुरुवर्य गुरुराज महाराज देगलूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली उंद्रीनगरीमध्ये दिंडी सोहळ्याचे आगमन झाले. व दिंडी सोहळा पुढे पंढरपूरकडे मार्गस्थ झाला. (छाया मनोज बिरादार)

# मठाधीश भाईनाथजी महाराज यांच्याकडून जि.प.धामणी नं.१ येथे शैक्षणिक साहित्य वाटप

संगमेश्वर/ प्रतिनीधी: धामणी येथे बुधवार दि. १९ जुन रोजी जि.प.आदर्श केंद्रशाळा धामणी नं.१ ता. संगमेश्वर या ठिकाणी सामाजिक सेवेचा वसा अंगिकारलेले श्री श्री श्री महंत पीरयोगी भाईनाथजी महाराज मठाधीश कालभैरव मठ खोपोली यांच्या वतीने धामणी गावातील सर्व शाळांमधील गरजू व होतकरू मुलाना शालेय गणवेश, दप्तर, छत्री,वह्या ,पेन,कंपासपेटी इत्यादी शैक्षणिक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच मुलांच्या स्पर्धा परीक्षांसाठी महाराजांनी चांगली आर्थिक तरतूद केली. सदर कार्यक्रमास स्वामीभक्त श्री.प्रभाकर शेठ घाणेकर, उपसरपंच श्री संगम पवार, ग्रामपंचायत सदस्या



सौ. स्वाती सप्रे,प्राजक्ता घाणेकर, सौ प्रेरणा लिंगायत, सौ शर्मिला गुरव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष केंद्र प्रमुख श्री जंगम, मुख्याध्यापक श्री गेल्ये,सर्व शिक्षक, श्री दिगंबर लिंगायत ( वार्ताहर) ग्रामस्थ विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

सदर कार्यक्रम उद्योजक श्री प्रभाकर शेठ घाणेकर यांच्या अथक प्रयत्नातून आणि प्रेरणेतून गेली १५ वर्षे अखंडपणे पार पडत आहे. कार्यक्रमाला स्वतः मठाधीश भाईनाथजी महाराज आणि त्यांचे भक्तगण उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गुरव गुरूजी जि.प.शाळा धामणी नं.२ यांनी केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT